ISSN 2231-1629

# Knowledge Resonance

A Half Yearly National Peer Reviewed Research Journal



## Bridging New Knowledge, Reducing COVID-19 Mortality

Vol 9 No.2 July-Dec. 2020

Research Journal Publication Committee
Dr. M. K. Umathe College, Nagpur

DR. M. K. UMATHE COLLEGE NAGPUR

................ 69
................ 73
................ 76
................ 79
................ 82
................ 86
................ 89
................ 93
................ 95
................ 99
................ 102
................ 105
................ 109
................ 112
................ 115
................ 118
................ 121
................ 124
................ 127

ISSN 2231-1629

Knowledge Resonance

• Vol-9 No. 2 • July-December 2020

38. तृतीयपंथी यांचे समाजशास्त्रीय अध्ययन ........ 130
डॉ. प्रमिला हरीदास भुजाडे

39. सुरेश भटांची गझल : एक आकलन ........ 137
डॉ. प्रशांत रामदासजी राऊत

40. आदीवासी समाजातील स्त्रियांच्या सामाजिक आणि आर्थिक समस्याचे समाजशास्त्रीय अध्ययन ........ 140
प्रा. डॉ. लालचंद किसन रामटेके

41. कुपोषण मुक्तीचा लढा ........ 143
प्रा. बाळकृष्ण कारू रामटेके

42. श्रीमती इंदिरा गांधींचे जनकल्याणकारी कार्य ........ 146
डॉ. संजय गोरे,

43. स्त्रीवाद आणि अर्थकारण ........ 148
डॉ. सुधिर सुरेश ढोरे, प्रा. संतोष अर्जुन शिंदे

44. भारतीय लोकशाही आणि महिला सक्षमिकरण ........ 151
प्रा. विजय शामरावजी कांडलकर

45. बालविकासाच्या संदर्भात मानवाधिकाराचे स्वरूप ........ 155
प्रा. विठ्ठल सदाशिव चौधरी

46. वर्गखोली बाहेरील शिक्षणाच्या परिणामकारकतेचा अभ्यास ........ 158
प्राचार्य डॉ. पांढरे विद्युलता

47. ग्रामसभेतून ग्रामविकासाला चालना : एक विश्लेषणात्मक अध्ययन ........ 160
(विशेष संदर्भ : ता. चोपडा, जि. जळगाव)
प्रा. रायपुरे विनोद अजाबराव, प्रा. गुजराथी आशिष सुभाषलाल,

48. भारतीय ग्रामीण समाज जीवन आणि म. गांधीजींचा आदर्शवाद ........ 164
प्रा. डॉ. सुषमा देशपांडे

49. बहुजन वर्गाची राष्ट्रीय परीक्षा ........ 166
डॉ. मनोहर नाईक

50. इयत्ता आठवीच्या विद्यार्थ्यांमध्ये कोडींग (प्रोग्राम भाषा) व्दारे शिक्षण आणि ........ 169
नाविन्यपूर्ण कौशल्य विकसनच्या परिणामकारकतेचा अभ्यास.
सुनिता मारुती जोगदनकर

51. महिला व कौटुंबिक हिंसाचार समाजशास्त्र विभाग ........ 172
प्रा. हर्षला सूर्यवंशी

52. भारतीय महिलांचा सामाजिक दर्जा ........ 175
प्रा. डॉ. वृशाली विलास कोल्हे

53. जल प्रदुषण और पर्यावरण ........ 179
प्रा. शैलेश बाबुराव पाटील

54. साहित्य और जीवन मूल्य ........ 184
सुश्री नम्रता जोसफ

55. वृध्दाश्रमों में रहने वाले वृध्दों की शारीरिक स्वास्थ्य स्थिती ........ 187
डॉ. राजेंद्र बगाटे

56. विदर्भात कोविड –19 जागतिक महामारीचा प्रभाव ........ 195
प्रा. डॉ. विजय के. बन्सोड

57. Exploring the Role of Teacher in English Language Teaching in Rural Areas ........ 199
Dr. Swapnil R. Dahat



DR. M. K. UMATHE COLLEGE NAGPUR

ISSN 2231-1629
Knowledge Resonance
• Vol-9 No. 2 • July-December 2020

# विदर्भात कोविड –19 जागतिक महामारीचा प्रभाव

प्रा. डॉ. विजय के. बन्सोड
सहयोगी प्राध्यापक, अर्थशास्त्र विभाग प्रमुख,
डॉ. एम.के. उमाठे कॉलेज, नागपूर 22.

## प्रास्ताविक

चीनच्या वुहान शहरातील करोना वायरस संक्रमणाने 30 जानेवारी 2020 ला जागतिक आरोग्य संघटनेने जागतिक सार्वजनिक चींता व आणिबाणी जाहीर केली. तसेच 11 मार्च 2020 ला यास जागतिक महामारी घोषीत केली. यात प्रत्येक राष्ट्राला कोविड –19 जागतिक महामारीशी लढण्यासाठी रणनिती बनविण्याची सुचना केली गोली. भारतातही या विषयासंबंधी उशीरा का होइना रणनिती तयार केली. यात रूग्ण असलेल्या भागात कन्टेनमेंट झोन तयार केले गेले. तसेच संपूर्ण भारतात लॉकडाउन 23 मार्च ला संचारबंदी व नंतर लॉकडाउनची घोषणा करण्यात आली मात्र महाराष्ट्रात या आधीच 16 मार्च पासुनच लॉकडाउनची घोषणा करण्यात आली होती. याशिवाय समाजात वावरतांना सामाजिक अंतर राखने, मास्कचा वापर, वारंवार सॅनिटाझरनी हात धुणे, अत्यावश्यक कामाशिवाय बाहेर न निघणे इत्यादी नियम तयार केल्या गेले. कोविड –19 या घातक विषाणुस रोकण्यासाठी कोणतेच औषध उपलब्ध नसल्याने रोज नविन नियम व पध्दतीची सुचना सरकार द्वारे केली जात होती. कोविड –19 या महामारीने संपूर्ण जगाला हादरून टाकले होते.

## शोध निबंधाची उद्दिष्टे –

1. कोविड –19 या जागतिक महामारीचा अभ्यास करणे.
2. भारतातील, महाराष्ट्रातील लॉकडाउनची पार्श्वभूमी अभ्यासणे.
3. कोविड –19 या जागतिक महामारीचा विदर्भावर झालेला आर्थिक परिणाम अभ्यासणे.

## विदर्भाची ऐतिहासिक पार्श्वभूमी :

1 मे, 1960 रोजी महाराष्ट्रात राज्याची निर्मिती झाली. या घटनेला 60 वर्षाचा प्रदीर्घ काळ लोटला आहे. विदर्भ हा महाराष्ट्राच्या भूभागाचा उच्च सांस्कृतिक, आर्थिक व संसाधनाने परिपूर्ण गौरवाने उल्लेख केला जातो. विदर्भात एकूण 11 जिल्ह्यांचा समावेश असून विदर्भाचे एकूण क्षेत्रफळ 97321 चौ.कि.मी. आहे. महाराष्ट्राच्या 31.06 टक्के भाग विदर्भाच्या वाट्याला आला असून 2011 च्या जनगणनेनुसार महाराष्ट्राच्या एकूण लोकसंख्ये पैकी 23 टक्के लोकसंख्या विदर्भाच्या वाट्याला आली आहे. विदर्भाचे भौगोलिक दृष्ट्या पहिला नागपूर विभाग (पूर्व विदर्भ) व दुसरा अमरावती विभाग (पश्चिम विदर्भ, वऱ्हाड) असे दोन भाग पडतात. विदर्भात महाराष्ट्राच्या एकुण संपत्तीतील 2/3 खनिज वनसंपदा व 3/3 वनसंपदा लाभलेली आहे.

विदर्भात काळे सोने म्हणजे कोळसा , पांढरे सोने म्हणजे कापूस , हिरवे सोने म्हणजे जंगल व नारंगी म्हणजे संत्री असणारा विभाग म्हणून नावलौकीक आहे. याशिवाय विदर्भात मॅगनीज, लोहा, चूना, टंगस्टन इत्यादी खनिजाचा खजाना मातीत भूगर्भात अस्तीतवात आहे. विदर्भात वैनगंगा, पैनगंगा, पुर्णा, वर्धा, पेंच या सारख्या मोठ्या नद्या वाहत असून विदर्भात कापूस, सोयाबिन, धान, तुर, डाळी, संत्रा अशा 32 प्रकारची पीके विदर्भाच्या मातीत पीकविल्या जाते. विदर्भात भरपूर पाण्याचे स्त्रोत, भरपूर खनिज असणारा आर्थिक दृष्ट्या समृद्ध व संपन्न असलेला प्रदेश आहे. विदर्भात वर्धा, नागपूर, भंडारा गोंदिया चंद्रपूर गडचिरोली, अमरावती, अकोला, बुलढाणा, यवतमाळ व वाशिम या 11 जिल्हयाचा समावेश आहे.

## भारतातील लॉकडाउनची पार्श्वभूमी :–

महाराष्ट्रात या आधीच 16 मार्च पासुनच लॉकडाउन घोषणा करण्यात आली होती. तसेच संपूर्ण भारतात लॉकडाउन 23 मार्च ला संचारबंदी व नंतर लॉकडाउनची घो ना करण्यात आली. भारत सरकारने या महामारी पासून देशातील जनतेचे संरक्षण करण्यासाठी लॉकडाउन व अनलॉक ची प्रक्रिया खालील प्रमाणे राबविली.

### लॉकडाउनची प्रक्रिया

| | | | | |
|---|---|---|---|---|
| पहिला टप्पा | – | 25 मार्च ते 14 एप्रिल 2020 | – | 30 दिवस |
| दुसरा टप्पा | – | 15 मार्च ते 03 मे 2020 | – | 19 दिवस |
| तिसरा टप्पा | – | 04 मे ते 17 मे 2020 | – | 14 दिवस |
| चौथा टप्पा | – | 18 मे ते 31 मे 2020 | – | 14 दिवस |



DR. M. K. UMATHE COLLEGE NAGPUR

**अनलॉक ची प्रक्रिया**

| | | |
|---|---|---|
| अनलॉक 1 | – 1 जुन ते 30 जून 2020 | – 30 दिवस |
| अनलॉक 2 | – 1 जुलै ते 31 जूलै 2020 | – 31 दिवस |
| अनलॉक 3 | – 1 ऑगष्ट ते 31 ऑगष्ट 2020 | – 31 दिवस |
| अनलॉक 4 | – 1 सप्टेंबर ते 30 सप्टेंबर 2020 | – 30 दिवस |
| अनलॉक 5 | – 1 ऑक्टोबर ते 31 ऑक्टो. 2020 | – 31 दिवस |
| अनलॉक 6 | – 1 नोव्हेंबर ते 30 नोव्हेंबर 2020 | – 30 दिवस |
| अनलॉक 7 | – 1 डिसेंबर ते 31 डिसेंबर 2020 | – 31 दिवस |

वरिल लॉकडाउन मध्ये 25 मार्च ते 31 मे पर्यंत संपूर्ण देशात इस्पीतळे, औषधी, किराना, भाजीपाला व अत्यावश्यक गरजेच्या सेवा सोडून इतर सर्व व्यावसायिक व खाजगी स्थापने बंद ठेवण्यात आले होते. शिक्षण, प्रशिक्षण, संशोधण संस्था बंद केल्या गेल्या. प्रार्थना स्थळे, सरकारी आणि खाजगी परिवहन सेवा स्थगीत केल्या गेल्या.तसेच सामाजिक, राजकिय, खेळ मैदाने, धार्मिक, सांस्कतिक कार्यक्रमांना बंदी घालण्यात आली. तसेच या बंदीचे सक्तीने पालन व अंमलबजावणी करण्यात आली होती.

1 जुलै 2020 पासून मात्र कोविड –19 या महामारीचा प्रकोप उच्च पातळीवर असताना वाढता जनक्षोभ व ढासळत्या अर्थव्यवस्थेस सावरण्यासाठी अनलॉकची प्रक्रिया सुरू करण्यात आली. प्रत्येक अनलॉकच्या कालावधित सर्व व्यावसायिक व खाजगी स्थापने, शिक्षण, प्रशिक्षण, संशोधण संस्था, प्रार्थना स्थळे, सरकारी आणि खाजगी परिवहन सेवा टप्पा–टप्प्याने सुरू करण्याची परवानगी देण्यात आली. सद्या देशातील सर्व व्यवसाय, संस्था, कारखाणे, व्यवस्थापणे पुर्ण क्षमतेने सुरू झालेले आहेत.

कोविड –19 या जागतिक महामारीचा विदर्भावर झालेला परिमानः

कोविड –19 या महामारीचा प्रकोप जसा संपूर्ण देशात झाला या प्रकोपात महाराष्ट्र व पर्यायाने विदर्भ अधिकच होरपडला असून त्या संबंधी 12 डिसेंबर 2020 तारखेपर्यंतची माहिती खालील प्रमाणे आहे

| जिल्हा | रूग्ण संख्या | बरे झालेले रूग्ण | मृत्यु संख्या | उपचारार्थी रूग्ण |
|---|---|---|---|---|
| नागपूर | 116535 | 106817 | 3784 | 5934 |
| भंडारा | 11435 | 10558 | 270 | 607 |
| वर्धा | 8329 | 7767 | 261 | 301 |
| गोंदिया | 12994 | 12438 | 170 | 386 |
| चंद्रपूर | 21180 | 19843 | 332 | 1005 |
| गडचिरोली | 8470 | 7958 | 91 | 421 |
| अकोला | 9824 | 8798 | 301 | 725 |
| अमरावती | 18467 | 17623 | 389 | 455 |
| यवतमाळ | 11880 | 11218 | 382 | 280 |
| बुलढाणा | 11735 | 11305 | 142 | 288 |
| वाशिम | 6346 | 6013 | 148 | 185 |

दैनिक टाईम्स ऑफ इंडीया 12 डिसेंबर 2020 मधे प्रकाशीत

वरिल तक्त्यावरून स्पष्ट होते की 12 डिसेंबर 2020 तारखेपर्यंत पर्यंत विदर्भात 237195 कोरोना बाधीत रूग्न होते तर 6270 इतके कोरोना मुळे मृत्यु नोंदविले होते. यात रूग्न संख्येच्या तुलनेत मृत्युचे प्रमान 2.64 टक्के होते. विदर्भात ऑगष्ट व सप्टेंबर या महिण्यात कोरोना बीधीतांच्या मृत्युने चिंता वाढविली होती. परंतु ऑक्टोंबर पासून यात घट झाली.

विदर्भात पहिल्या मृत्युची नोंद बुलढाना जिल्हयात झाली होती. विदर्भात झालेल्या मृत्युची संख्या व महिना अनुक्रमे एप्रिल – 19 मृत्यु, मे – 55 मृत्यु, जुन – 91 मृत्यु, जुलै – 229, ऑगष्ट – 1202 मृत्यु, सप्टेंबर – 2448 मृत्यु, ऑक्टोंबर – 1492 मृत्यु, नाव्हेंबर – 535 मृत्य, 12 डिसेंबर पर्यंत – 199 मृत्यु झाले होते. विदर्भात सर्वाधिक मृत्यु नागपूर जिल्हयात झाले असून सर्वात कमी मृत्यु वाशिम जिल्हयात झाले आहे. विदर्भात कोरोनामुळे झालेल्या पहिल्या 1000 मृत्युची संख्या गाठायला 145 दिवस, 2000 मृत्युची संख्या गाठायला 145 दिवस, 17 दिवस, 3000 मृत्युची संख्या गाठायला 11 दिवस, 4000 मृत्युची संख्या गाठायला 13 दिवस, 5000 मृत्युची संख्या गाठायला 23 दिवस, 6000 मृत्युची संख्या गाठायला 36 दिवस लागले.

देशात कोरोना रूग्नांची संख्या 12 डिसेंबर 2020 पर्यंत 9802775 असून यातुन 9324328 रूग्न बरे झाले असून मृत्युची संख्या 142628 असून मृत्यु दर 1.45 टक्के होता. महाराष्ट्रात कारोना रूग्नांची संख्या 12 डिसेंबर 2020 पर्यंत 1876699 असून यातुन 1753922 रूग्न बरे झाले असून मृत्युची संख्या 48139 असून मृत्यु दर 2.50 टक्के होता. विदर्भात मृत्यु दर हा देश व महाराष्ट्राच्या तुलनेत अधिक असून तो 2.54 टक्के होता.

### कोविड –19 या जागतिक महामारीचा विदर्भावर झालेला आर्थिक परिण्णम :

महाराष्ट्रात 16 मार्च पासून लॉकडाउन लावल्या गेल्यामुळे राज्यातील सर्व आर्थिक घडामोडी ठप्प झाल्या. यामुळे लाखो कामगारांचे हात पर्यायाने खीसेही रिकामे झाले. भारतात जवळपास



DR. M. K. UMATHE COLLEGE NAGPUR

92 टक्के कामगार असंघटीत क्षेत्रात काम करतात. लॉकडाउन लावल्या गेल्यामुळे यांचा सर्वाधिक फटका याच वर्गाला बसला होता. लॉकडाउन लावल्या गेल्यामुळे सर्व उत्पादन व व्यवसायिक धंदे हे बंद पडले शिवाय भारत सरकारने लॉकडाउन तडकाफडकी लावल्यामुळे तसेच हा लॉकडाउन किती दिवसा पर्यंत राहिल याची कुणालाच कल्पना नसल्याने सर्व प्रवासी मजुर कासाविस व सैरावीर झाले. एकीकडे कडक लॉकडाउन व दुसरीकडे सर्व सार्वजनीक व खाजगी प्रवासी परिवहन व्यवस्था बंद यातच प्रवासी मजुरांचे लोंढे मिळेल त्या मार्गाने किंवा पायीच आपल्या गावाकडे निधाल्याचे विदारक चित्र सर्व लोकांनी व निर्दयी सरकार व प्रशासनाने पाहीले.

**विदर्भातील जनतेवर कोविड –19 या जागतिक महामारीचा झालेले परिणाम खालील प्रमाणे आहेत.**

1) देशातील इतर भागा प्रमाणेच विदर्भातही कडक लॉकडाउन केल्यामुळे करोडो लोकांचे काम व व्यवसाय बंद झाल्याने प्रचंड आर्थिक अडचनीचा सामना करावा लागला.

2) कुशल श्रमिक, अर्ध कुशल श्रमिक, व अकुशल श्रमिक, यात अकुशल श्रमिकांचे जास्त हाल झाले.

3) दुकाने, मॉल्स या सारख्या ठिकाणी काम करणाऱ्या अध विळ कामगारांचा रोजगार गेल्याने त्यांच्यासमोर उपासमारीचे संकट उभे झाले.

4) खाजगी परिवहन सेवेतील कामगारांचे लॉकडाउन केल्यामुळे कर्जाचे हप्ते थकले व रोजगार बुडाल्यामुळे दुहेरी संकटांना त्यांना तोंड द्यावे लागले.

5) लॉकडाउन मधे लोकांना चढया किंमतीत वस्तु विकत घ्याव्या लागल्याने सर्व ग्राहक वर्गाचे आर्थिक नुकसान झाले.

6) लॉकडाउन ते आजतयागत सर्व जनतेस कोरोना रोगापासून लांब राहण्यासाठी रोग प्रतिकारक शक्ति वाढविण्यासाठी पुरक आहार, औषधी, सॅनिटायझार, मास्क इत्यादि खर्चाचा नाहक भुर्दंड पडला.

7) ब–याच कोविड –19 पॉझीटीव्ह रूग्नांकडून खाजगी रूग्नालयांद्वारे लाखो रूपयाचे बिल वसुल करे गेले.

8) कोविड –19 पॉझीटीव्ह रूग्न सापडल्यास तेथील सभोवतालचा परिसर सील केल्यामुळे सर्व लोकांना सक्तीच्या स्थानबध्दतेमुळे मनस्ताप व आर्थिक नूकसान सहन करावे लागले.

9) कोविड –19 महामारीत अनेक कोविड वॉरियर्स, कुटुंब प्रमुख किंवा कर्ता व्यक्ति मृत्यु पावल्याने त्यांच्या कुटूंबीयांचे अपरिमीत नुकसान व जन्माची हानी झाली.

10) लॉकडाउन च्या सुरवातीच्या काळात ग्रामिण भागात रूग्न असण्याची कोणतीही शक्यता नसताना देखील तिथेही लॉकडाउनचे नियम लावल्याने शेतमजुर व शेतकऱ्यांचे आर्थिक नुकसान झाले आहे.

कोविड –19 या जागतिक महामारीचा देशातील प्रत्येक व्यक्तिवर प्रतिकूल परिणाम झालाच आहे. एवढेच की ज्यांनी या महामारीत आपले स्वजन गमावले त्यांच्यासाठी ही महामारी दुःखद घटना आहे. ज्यांचे कोविड –19 या जागतिक महामारीत आर्थिक नुकसान झाले, ज्यांना हाल अपेष्टा, उपासमार सहन करावी लागली त्यांना या महामारीने बरेच काही शिकविले असून प्रत्येकाने या महामारीपासून जो धडा घेतला तो त्याच्या कायम कामी येइल कारण कोरोना महामारी अजून संपलेली नाही.

*संदर्भ:*


1) *लोकमत दैनिक वर्तमान पत्र 12 डिसेंबर 2020*
2) *दैनिक टाईम्स ऑफ इंडीया 12 डिसेंबर 2020*


PRINCIPAL
Dr. M. K. Umathe College
Nagpur - 440022

SL.NO. - MKU/KRJ/2020/July-Dec/061

# Knowledge Resonance

A Half Yearly National Peer Reviewed Research Journal

ISSN 2231 - 1629

Dr. M. K. Umathe Arts, Science & R. Mokhare Commerce College

## CERTIFICATE OF PUBLICATION

This is to certify that the review board of our research journal accepted the research paper

डॉ. विजय के. बन्सोड

( डॉ. एम. के. उमाठे कॉलेज, नागपूर)

विदर्भात कोविड-१९ जागतिक महामारीचा प्रभाव

It is peer reviewed and published in the **Issue 9 Vol - 2 of July-Dec. 2020**

Thank you for sending your valuable writing for knowledge resonance journal.

| | | |
|---|---|---|
| Dr. Vinod B. Khedkar<br>Sub - Editor<br>Dr. M. K. Umathe College,<br>Nagpur | Dr. Kalpana Tekade<br>Editor<br>Dr. M. K. Umathe College,<br>Nagpur | Dr. D. V. Naik<br>Editor in Chief<br>Dr. M. K. Umathe College,<br>Nagpur |

PRINCIPAL
Dr. M. K. Umathe College
Nagpur - 440022